देयकांचे अदायगीकामी लेखा विभागाकडे बिले सादर करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
लेखा विभाग
जा.क्र/लेखा/२अ/कावि/१६०० /२०१९
दिनांक - ०९/१२/२०१९

परिपत्रक,

लेखा विभागामार्फत विविध विभागांकडून सादर करण्यात येणा-या बिलांचे अदायगीचे कामकाज करण्यात येते. त्याकरिता बिलासोबत विहित नमुन्यातील पडताळणी (Checklist) संबंधीत विभागप्रमुखांमार्फत प्रमाणित करून सादर करणेकामी सुचीत करण्यात आलेले होते. परंतु लेखा विभागामध्ये देयक तपासताना असे निदर्शनास आले आहे की, देयकासोबत विहित नमुन्यातील पडताळणी (Checklist) वर विभागप्रमुखांची स्वाक्षरी दिसुन येत नाही तसेच Checklist मध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची पूर्तता केली जात नाही. त्यामुळे संबंधीतास बिल अदायगी करणेकामी अडचणी निर्माण होत आहेत व बिल तपासणीकामी विलंब होत आहे.

लेखा विभागामध्ये बिल तपासणी कामकाज सुलभ होण्याकरीता सर्व विभागांना पुन्हा सुचीत करण्यात येते की, Checklist मधील सर्व बाबींची पुर्तता करणेत यावी व त्या बाबी ह्या देयकावर नमूद केलेल्या बाबींशी सहमत असाव्यात व त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी घेऊनच बिल लेखा विभागाकडे सादर करणेत यावे. या पुढे वरीलप्रमाणे पूर्तता करण्यात न आलेल्या बिलांची लेखा विभागामार्फत अदायगी न करता ती विभागाकडे परत पाठविणेत येतील. सदर परिपत्रकाची नोंद सर्व विभागांनी घेण्यात यावी व सर्व संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे.

**मुख्य लेखा अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति :-
सर्व विभागप्रमुख